# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १८१** **दिनांक ०६/०७/२०२१**

## कोकेन अंमली पदार्थ विक्री करणारे २ नायजेरीयन अटकेत, अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी.

दिनांक ०५/०७/२०२१ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली की, 'हाटकेश परिसरामध्ये काही संशयीत नायजेरीयन व्यक्तींनी कोकेन नावाचा अंमली पदार्थ विक्रीसाठी आणलेला असून ते कोकेनची विक्री करणार आहेत.' सदरची मिळालेली बातमी वरिष्ठांना कळवून वरिष्ठांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे सापळा लावला असता, नेहा बिल्डींग हाटकेश येथून एका नायजेरियन व्यक्तीचे ताब्यातून १२० ग्रॅम व गौरव नमन बिल्डींग, हाटकेश येथून दुस-या नायजेरियन व्यक्तीचे ताब्यातून ११८ ग्रॅम वजनाचे कोकेन, असे एकुण २३८ ग्रॅम कोकेन जप्त करण्यात आले असून सदर कोकेनची आंतरराष्ट्रीय बाजारात ३५,७०,०००/-रु. एवढी किंमत आहे. सदरचे मिळून आलेले अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असुन २ नायजेरीयन व्यक्तींना अटक करुन त्यांचेविरुध्द काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुरनं. ।। ४७४/२०२१ एनडीपीएस ॲक्ट कलम ८ क व २१ क नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा पुढिल तपास पोनि. विजय पवार, काशिमिरा पोलीस स्टेशन हे करीत आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. श्री. देवीदास हंडोरे,अंमली पदार्थ विरोधी पथक, पोनि. राहूल राख, मपोसपोनि. शिंदे, मिरारोड पो. स्टे., पोहवा. इंगळे, पोना. पवन पाटील, विनोद राउत, पोशि अजय यादव, ईश्वर पाटील, मपोशि. प्रतिभा जाधव यांनी केली आहे.

-----oooo-----